# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## कृषिनगर, अकोला ४४४ १०४ (महाराष्ट्र)

सूचना का अधिकार

**डॉ. पी.आर. कडू**
कुलसचिव

Phone No. : 0724-2258372
Fax No. : 0724-2258386
E-Mail –registrar@pdkv.ac.in

**महत्वाचे**

**सन २०१८-२०१९ या वर्षाकरीता विद्यापीठ सेवेतील गट 'ड' मधील कर्मचा-यांच्या वैयक्तीक नस्त्या अद्ययावत ठेवणेबाबत....**

**वाचा :** (१) शासन निर्णय क्र. सीएफआर-१२९३/९५३/प्र.क्र. ९६/९३/१३, दि. २६ जुलै, १९९४
(२) विद्यापीठ परिपत्रक क्र. बीएए/०९९४/८०, दि. २६ सप्टेंबर, १९९४
(३) शासन परिपत्रक क्र. सीएफआर-१२०१/ ७२५/१३, दि. २७ फेब्रुवारी, २००३

## परिपत्रक

क्रमांक : बीएए/०२/२०१९/७५ दिनांक : ०६ मार्च, २०१९

विद्यापीठातील सर्व प्रतिवेदन अधिकारी व पुनर्विलोकन अधिकारी हयांना कळविण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णय क्रमांक १ नुसार महाराष्ट्र शासनाने चतुर्थ श्रेणी ('ड' गट) कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल लिहीण्याची पध्दत सन १९९४-१९९५ या वर्षापासून बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

तथापी ही पध्दत बंद केल्यानंतर या सेवकांच्या पदोन्नत्या, स्थायीकरण, दक्षता रोध, आगाऊ वेतनवाढी, सेवेत ५५ वर्षानंतर पुढे चालु ठेवण्यासाठी पुनर्विलोकन इ. सेवा विषयक बाबी हाताळणे शक्य व्हावे या दृष्टीने अशा कर्मचा-यांच्या चांगल्या कामाची अथवा त्यांच्याकडून घडलेल्या प्रमादाची/ वाईट वर्तणुकीची नोंद ठेवणे आवश्यक असल्याने याबाबत अवलंबिण्यात येणारी कार्यपध्दती सदंर्भिय शासन निर्णय व विद्यापीठ परिपत्रकामध्ये नमुद करण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने सन २०१८-२०१९ या वर्षाकरीता विद्यापीठातील सर्व विभाग/ कार्यालयांतर्गत कार्यरत असलेले प्रयोगशाळा परिचर आणि कृषि मुल्य योजने अंतर्गत कार्यरत असलेले प्रक्षेत्र सहायक वगळता विद्यापीठातील 'ड' गटातील सर्व कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल न लिहीता त्यांची चांगली/ वाईट वर्तणुक व त्यांनी उल्लेखनीय काम केले असेल तर, त्याबाबतचे अभिप्राय लिहून ते त्या कर्मचा-यांच्या वैयक्तीक नस्तीत ठेवण्यासंबंधी विद्यापीठातील सर्व प्रतिवेदन अधिकारी व पुनर्विलोकन अधिकारी यांना पुनश्चः अवगत करण्याच्या दृष्टीने संदर्भिय शासन निर्णय, परिपत्रक व प्रमाणपत्राचा नमूना विद्यापीठ संकेतस्थळ ***(www.pdkv.ac.in)*** वर या परिपत्रकासोबत प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

त्यानुसार विद्यापीठातील सर्व प्रतिवेदन अधिकारी व पुनर्विलोकन अधिकारी यांना पुनश्चः सुचीत करण्यात येते की, उपरोक्त नमुद शासन निर्णय व परिपत्रकानुसार सन २०१८-२०१९ या वर्षाकरीता चतुर्थ श्रेणी ('ड' गट) कर्मचा-यांच्या वैयक्तीक नस्त्या अद्ययावत ठेवल्या जातील याची दक्षता घेण्यात यावी व उपरोक्त शासन निर्णयानुसार आपल्या कार्यालयीन स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

माहितीकरीता प्रमाणपत्राचा नमूना या परिपत्रकासोबत सहपत्रीत करुन पाठविण्यात येत आहे.

मा. कुलगुरु महोदय यांच्या मान्यतेने.

सहपत्र : वरील प्रमाणे

स्वा/-
कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रति,

सर्व कार्यालय/ विभाग प्रमुख/ प्रभारी अधिकारी,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

*प्रतिलिपी :*

(१) प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती केंद्र (ARIS Cell), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना कळविण्यात येते की सदर परिपत्रक व सहपत्रित सर्व दस्तऐवज विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करून देण्यात यावे.

(२) कुलगुरु यांचे स्विय सहायक यांना मा. कुलगुरु महोदय यांचे माहितीकरीता सादर.

# <u>प्रमाणपत्राचा नमुना</u>

श्री. ........................................................................... हे या कार्यालयाच्या अधिनस्त मजुर/ परिचर/ चौकीदार/ माळी/ सफाई कामगार/ ग्रंथालय परिचर/ मत्स्य सहायक/ सफाई पर्यवेक्षक/ खानसामा/ प्रक्षेत्र सहायक/ व्हॉलमन या पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या सन २०१८-२०१९ या वर्षातील (दि. ................................ ते दि.................................... ) या कालावधीमध्ये त्यांनी केलेल्या कामाची नोंद घेण्यात आली असून त्यांचे कामाचे मुल्यांकन खालील प्रमाणे आहे.

(अ) अत्युकृष्ट (ब) उत्कृष्ट (क) वाईट

शेरा : ........................................

ठिकाण :
दिनांक :

प्रतिवेदन अधिका-याची सही/ नाव/ पदनाम

**टिप :**

(१) कृषि मुल्य योजने अंतर्गत कार्यरत असलेले प्रक्षेत्र सहायक वगळता इतर सर्व विभाग/ कार्यालयातील प्रक्षेत्र सहायकांकरीता सदर प्रमाणपत्र लागू राहील.

(२) उपरोक्त नमूद कर्मचा-यांचे प्रमाणपत्र कुलसचिव कार्यालयास न पाठविता आपले कार्यालयीन स्तरावर संबंधीत कर्मचा-यांच्या वैयक्तीक नस्तीला जोडण्यात यावे.

"ड" गटातील कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल लिहिण्याची पध्दत बंद करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र.सीएफआर-1293/953/प्र.क्र.96/93/13,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 26 जुलै 1994.

## शासन निर्णय

चतुर्थ श्रेणीतील (आताचे "ड" गटातील) शासकीय कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल लिहिण्याची प्रथा शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.सीएफआर-1276/दहा-अे, दिनांक 13 जुलै, 1976 अन्वये 1975-76 सालापासून सुरु करण्यात आली. गोपनीय अहवाल लिहिण्याची सदर प्रथा बंद करण्यात यावी अशी मागणी चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटनेकडून करण्यात आली होती. ती मागणी शासनाच्या विचाराधीन होती. आता शासनाने असा निर्णय घेतला आहे की, "ड" गटातील कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल लिहिण्याची पध्दत 1994-95 या वर्षापासून बंद करण्यात यावी.

2. शासकीय सेवेतील वरील कर्मचा-यांची गोपनीय अहवाल लिहिण्याची पध्दत बंद केल्यानंतर या सेवकांच्या पदोन्नत्या, स्थायीकरण, दक्षता रोध, आगाऊ वेतनवाढी, सेवेत 55 वर्षानंतर पुढे चालू ठेवण्यासाठी पुनर्विलोकन इ. सेवाविषयक बाबी हाताळणे शक्य व्हावे यादृष्टीने अशा कर्मचा-यांच्या चांगल्या कामाची अथवा त्यांच्याकडून घडलेल्या प्रमादाची/वाईट वर्तणूकीची नोंद ठेवणे आवश्यक असल्याने असाही निर्णय घेण्यात आला आहे की, विभागातील "ड" गटातील प्रत्येक कर्मचा-यासाठी जी वैयक्तिक नस्ती (Personal File) ठेवण्यात येते, त्यांत कर्मचा-यांच्या उत्कृष्ट/वाईट अशा दोन्ही प्रकारच्या कामासंबंधी वर्षनिहाय नोंद घेण्यात यावी. जेथे अशा प्रकारची नोंद/नोंदी उपलब्ध नसतील तेथे त्या कर्मचा-यांचे वर्तन सर्वसाधारण चांगल्या स्वरुपाचे आहे असे समजण्यात यावे व त्यांना अनुज्ञेय असलेले सेवाविषयक लाभ, उदा. पदोन्नती, दक्षतारोध पार करण्यास अनुमती इ. देण्यास प्रत्यवाय नसावा. तथापि, आगाऊ वेतनवाढी, प्राथम्य तत्वावर पदोन्नती किंवा सक्तीने सेवानिवृत्ती या बाबींसंबंधी उत्कृष्ट/वाईट अशा विशिष्ट नोंदी-अभावी कार्यवाही करण्यात येऊ नये.

3. वरील प्रकारे वैयक्तिक नस्ती ठेवताना खालील कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

(1) "ड" गटातील कर्मचा-यांच्या सेवा ज्या अधिका-यांना उपलब्ध करुन देण्यात येतील त्यांनी त्या कर्मचा-यांची चांगली/वाईट वर्तणूक व त्याने उल्लेखनीय काम केले असेल तर, त्याबाबतचे अभिप्राय लिहून ते त्या कर्मचा-यांच्या वैयक्तिक नस्तीत ठेवण्यासाठी संबंधीत आस्थापना अधिका-याकडे पाठवावेत.

(2) ज्या कर्मचा-यांच्या वैयक्तिक नस्तीत त्यांना प्रतिकूल ठरतील असे अभिप्राय नोंदविलेले असल्यास संबंधीत कर्मचा-याच्या निदर्शनास ते आणून देण्यात यावेत व त्याची प्रत त्यांच्या वैयक्तिक नस्तीत ठेवण्यात यावी.

(3) "ड" गटातील कर्मचा-यांची एका विभाग/कार्यालयातून दुस-या विभाग/कार्यालयात बदली झाल्यास त्याची

c/3

वैयक्तिक नस्ती त्या विभाग/कार्यालयाकडे पाठविण्यात यावी. वैयक्तिक नस्तीतील अभिलेख विचारात घेऊन नंतरच आवश्यक ती कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्र.मा.जोशी)
शासनाचे उप सचिव.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय, मुंबई,
व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई,
येरवडा तुरुंग मुद्रणालय, पुणे/शासकीय मुद्रणालय, नागपूर,
मंत्रालयाच्या विविध विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख आणि कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग.

* पत्राने.

------

एन-820(5,000-7-94)

पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला-४४४ १०४

**परिपत्रक**

क्र•बीएए/०९९४/ 10 दिनांक: २६•९•१९९४•

विद्यापीठातील सर्व प्रतिवेदन अधिकारी (रिपोर्टींग ऑफीसर) व पुनर्विलोकन अधिकारी (रिव्यूईंग ऑफीसर) ह्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने चतुर्थश्रेणी ("ड"-गट) कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल लिहिण्याची पध्दत शासन निर्णय क्र•सीएफआर-१२९३/९५३/प्र•क्र•९६/९३/१३, दि•२६ जुलै,१९९४ नुसार १९९४-९५ या वर्षा-पासून बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे• शासन निर्णयाची प्रत ह्या परिपत्रकासोबत मार्गदर्शनासाठी पाठविण्यात येत आहे• ह्या निर्णयानुसार ह्यापुढे चतुर्थश्रेणी कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल लिहिण्यात येवू नयेत, मात्र त्यांची वैयक्तिक नस्ती (पर्सनल फाईल) ठेवण्यात यावी व त्यामध्ये कर्मचा-यांच्या उत्कृष्ट/वाईट अशा दोन्ही प्रकारच्या कामासंबंधी वर्षा-निहाय नोंद घेण्यात यावी व ती नस्ती संबंधित कार्यालय प्रमुख/ईचार्ज ह्यांचे जवळ ठेवावी• ह्याबाबत वैयक्तिक नस्ती ठेवतांना कोणती कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी ह्याची माहिती सोबतच्या शासन निर्णयात दिली आहे, त्या सुचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे•

कुलगुरुंच्या मंजुरी व आदेशानुसार•

स्वाक्षरीत/- कुलसचिव,
पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला

क्र•बीबीएए/०९९४/ 10
पं•कृ•वि•, अकोला, दि•२६•९•१९९४•

प्रति,

______________________

______________________

______________________

ह्यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित•

(स्वाक्षरी) २।१०।९४

उपकुलसचिव, (आस्था•)
पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला•

गट 'ड' मधील कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक नस्त्या अद्ययावत ठेवणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांकः सीएफआर-१२०१/७२५/१३,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांकः २७ फेब्रुवारी, २००३

**वाचा:-** १) शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. सीएफआर-१२९३/९५३/प्र.क्र.९६/९३/१३, दिनांक २६ जुलै, १९९४.

परिपत्रक

चतुर्थ श्रेणीतील ('ड' गटातील) शासकीय कर्मचाऱ्यांचे सन १९९४-९५ या वर्षापासून गोपनीय अहवाल लिहिण्याची पध्दत शासन निर्णय क्र. सीएफआर-१२९३/९५३/ प्र.क्र.९६/९३/१३, दिनांक २६ जुलै, १९९४ अन्वये बंद करण्यात आली आहे. त्याऐवजी विभागातील 'ड' गटातील प्रत्येक कर्मचाऱ्यासाठी ठेवण्यात येणाऱ्या वैयक्तिक नस्तीमध्ये संबंधित कर्मचाऱ्याच्या उत्कृष्ट/वाईट अशा दोन्ही प्रकारच्या नोंदी घेण्यात याव्यात अशा सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, दिनांक २६ जुलै, १९९४ च्या आदेशान्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जात नाही यास्तव सदर आदेशाचा पुनरुच्चार करुन असे निर्देशित करण्यात येते की, सदर आदेशांचे काटेकोरपणे पालन केले जाईल व त्या अनुषंगाने गट 'ड' मधील कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक नस्त्या अद्ययावत ठेवल्या जातील याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( बा. बा. नारायणकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचेसचिव
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई,
संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय, मुंबई,
व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई,
येरवडा तुरुंग मुद्रणालय, पुणे शासकीय मुद्रणालय, नागपूर,
मंत्रालयाच्या विविध विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख आणि कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,
* पत्राने